आजचा दिनविशेष
१९८७ : श्रीलंकेत भारतीय शांतता रक्षक दलाने ऑपरेशन पवन सुरू केले.

दैनिक लोकक्रांतीचा आरंभ

# लोकआरंभ

dainiklokaarambh@gmail.com

LOK AARAMBH | संपादक:राहुल मारोतीराव वाईकर | कार्यकारी संपादक गोकुळ इंगोले

बीड/महाराष्ट्र वर्ष ३ रे | शनिवार ११ ऑक्टोबर २०२५ | अंक २८९● पाने ४ | RNI/MAHMAR/2022/84215 | किंमत २ रु







# अजून किती दिवस कोसळणार ? महाराष्ट्रातून मान्सून कधी परतणार, पावसाचा कहर कायम

अवध्या काही दिवसांपूर्वी महाराष्ट्रातील अनेक भागात सतत कोसळणाऱ्या पावसाचा धूमाकूळ सुरू होता. नवरात्र, दसरा झाला, ऑक्टोबर महीना उजाडला तरी पाऊस परत जाण्याची काही चिन्हे दिसेनात. अतिवृष्टीमुळे अनेक ठिकाणी मोठं नुकसान झाल, जमिनी खरडून गेल्या, पीक वाहून गेली, घरं बुडाली. मात्र पावसाचा कहर कायम होताचय यामुळेच अखेर मान्सून परतणार कधी असा प्रश्न सर्वसामान्य जनतेच्या मनात असून आता पावसाबद्दल मोठे अपडेट्स समोर आले आहेत. लवकरच पावसाचा परतीचा प्रवास सुरू होण्याची शक्यता हवामान विभागाने वर्तवली आहे. खरंतर गेल्या काही दिवसांपासून मोसमी पावसाच्या परतीचा प्रवास लांबला आहे. राजस्थानच्या काही भागातून मोसमी वाऱ्यांनी माघार घेतली. त्यानंतर मात्र पावसाच्या परतीचा प्रवास खोळंबला असतानाच पुढील एक दिवसांत महाराष्ट्रासह मध्य प्रदेश आणि उत्तर प्रदेशच्या काही भागातून मोसमी वारे माघार घेण्याची शक्यता वर्तविण्यात आली आहे. जून, जुलै या दोन महिन्यांत पावसाचे प्रमाण कमी होते. महिन्यातील दोन दिवस पडलेल्या मुसळधार पावसामुळे सरासरी ओलांडणे शक्य झाले. तर ऑगस्टमध्ये बराच आणि सप्टेंबरमध्ये



तर राज्यात सर्वत्र मुसळधार पाऊस कोसळला. मराठवाडा, पश्चिम महाराष्ट्र येथे पूरस्थिती निर्माण झाली होती. सरासरीपेक्षा जास्त पाऊस यंदा झाला आहे. अतिवृष्टीमुळे शेतकऱ्यांचे नुकसान झाले, सर्वसामान्यांचेही मोठे हाल झाले.पावसाची माघार कधी ? दरम्यान, 14 सप्टेंबर रोजी नैऋत्य मोसमी पावसाचा परतीचा प्रवास राजस्थानमधून सुरू झाला. पश्चिम राजस्थानच्या काही भागातून मोसमी वाऱ्यांनी माघार घेतली. आणखी काही भागांमधून मोसमी वाऱ्यांनी परतीचा प्रवास सुरू केला. यावेळी महाराष्ट्रातून ऑक्टोबरच्या पहिल्या आठवड्यात पाऊस माघारी फिरेल, अशी शक्यता वर्तवण्यात आली होती. त्यानंतर बंगालच्या उपसागरात लागोपाठ निर्माण झालेले कमी दाब क्षेत्र, तसेच शक्ती चक्रीवादळ यामुळे मोसमी पावसाचा परतीचा पाऊस लांबला. साधारण 10 ते 12 दिवसांपासून पावसाचा परतीचा प्रवास खोळंबला. मात्र पुढील एक ते दोन दिवसांत राज्यातून मोसमी पावसाच्या परतीचा प्रवास सुरू हण्याची शक्यता हवामान विभागाने वर्तवली आहे.

उकाडा सुरू झालामान्सू अद्याप पूर्णपणे गेला नसला तरीही काही दिवसांपासून पावसाने ओढ दिल्यामुळे उकाडा सहन करावा लागत आहे. मुंबईसह इतर भागातही दिवसभर असह्य उकाडा सहन कारावा लागत आहे. हवामान विभागाच्या कुलाबा केंद्रात गुरुवारी 31.8 अंश सेल्सिअस, तर सांताक्रूझ केंद्रात 32.8 अंश सेल्सिअस कमाल तापमानाची नोंद झाली.

## जिल्हा प्रशिक्षण केंद्र बीड परिसरातील रस्त्याच्या कामात गंभीर अनियमितता!

बीड – प्रतिनिधी)जिल्हा प्रशिक्षण केंद्र (आरोग्य विभाग, जिल्हा परिषद बीड) परिसरात अवघ्या दोन दिवसांपूर्वी सुरू करण्यात आलेले रस्त्याचे काम अत्यंत निकृष्ट दर्जाचे व बोगस पद्धतीने करण्यात आल्याचा आरोप स्थानिक नागरिकांनी केला आहे. रस्त्याचे काम सुरू होताच काही तासांतच त्याची गुणवत्ता उघडकीस आली असून, सिमेंट एकदम बकवास वापरला आहे-काँक्रीट व बुकटा प्रमाण अत्यल्प असल्याचे दिसून आले आहे. या संदर्भात नागरिकांनी लवकरच बीडचे पालकमंत्री अजित दादा



पवार यांच्याकडे औपचारिक तक्रार दाखल करण्याचा इशारा दिला आहे. नागरिकांचे म्हणणे आहे की, बीडमध्ये बारामतीसारखा विकास होईल असे पालकमंत्री आश्वासन देतात, परंतु प्रत्यक्षात सार्वजनिक बांधकाम विभाग आणि ठेकेदारांकडून अत्यंत निष्काळजीपणे कामे केली जात आहेत. स्थानिकांच्या मते, वरिष्ठ अधिकाऱ्यांकडून ठेकेदारांना सरळ "पोहोच" असल्याने या कामांवर कोणतीही देखरेख ठेवली जात नाही. परिणामी, शासनाचा निधी वाया जात असून जनतेला निकृष्ट दर्जाच्या सुविधा मिळत आहेत. सदर प्रकरणी संबंधित अधिकाऱ्यांची जबाबदारी निश्चित करण्याची आणि ठेकेदारावर कारवाई करण्याची मागणी नागरिकांनी केली आहे.

## बबनराव घोलप यांच्या वाढदिवसानिमित्त अतिवृष्टी ग्रस्त पूरग्रस्त पलावरील महिलांना साडी वाटप :– नानासाहेब घोडके राष्ट्रीय चर्मकार महासंघाचा उपक्रम

माजलगाव प्रतिनिधी _ राष्ट्रीय चर्मकार महासंघ माजलगाव जिल्हा बीड च्या वतीने राष्ट्रीय चर्मकार महासंघ संस्थापक अध्यक्ष तथा माजी समाज कल्याण मंत्री बबनराव घोलप साहेब यांच्या वाढदिवसानिमित्त अतिवृष्टी ग्रस्त, पूरग्रस्त, पालवरील महिलांना साडी वाटपाचा कार्यक्रम दिनांक १०/१०/२५ रोजी श्रावस्ती बुद्ध विहार केसापुरी कँप माजलगाव येथे आयोजित करण्यात आला कार्यक्रमाचे अध्यक्ष राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे शरद पवार गट माजलगाव मतदार संघाचे नेते मोहनराव जगताप कार्यक्रमाचे उद्घाटक महिला जिल्हाध्यक्षा सौ शारदा ताई वाघमारे प्रमुख पाहुणे राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी नेते शरद पवार गट सुनील शिंदे, कृष उ बा समीती सचिव हारीभाऊ सवने, सद् धम्म सेवा संघ अध्यक्ष सदाशिव भालेराव सर,संभाजी ब्रिगेड तालुकाध्यक्ष तुकाराम नावडकर या सर्वांच्या वतीने गौतम बुद्ध, महामानव डॉ बाबासाहेब आंबेडकर,श्रीरोमनी गुरू रविदास महाराज यांचे पुजण करून सर्व पाहुण्यांचे स्वागत करून कार्यक्रमाची सुरुवात करण्यात आली कार्यक्रमाची प्रस्तावना करीत असताना जिल्हाध्यक्षा नानासाहेब घोडके यांनी आज जि अतिवृष्टी मुळे नुकसान झाली गोरीब बेघर झाले कोनस कपडया लत्याची नास धुस त्यामुळे मा.बबनराव घोलप साहेब यांच्या वाढदिवसानिमित्त या सर्व आपत्ती ग्रस्त महिलांसाठी साडी वाटप व जेवनाचा करण्याचा निर्णय घेऊन या पुढे ही अपत्ती ग्रस्ताना गोरगरीब मजुर लोकांना आधार देण्याचे काम करू असे आश्वासन दिले



महिला जिल्हाध्यक्षा सौ शारदा ताई वाघमारे यांनी घोलप साहेब यांच्या कार्याचा संदर्भा देऊन वाढदिवसाच्या शुभेच्छा दिल्या अध्यक्षीय भाषणात मा मोहन दादा जगताप यांनी पुरग्रस्त अतिवृष्टी ग्रस्त झालेल्या नुकसानीबद्दल माहिती सांगत असताना वेदना वेक्त केल्या महासंघाच्या वतीने हा चांगला उपक्रम राबला त्याबद्दल आभार वेक्त करून मा बबनराव घोलप साहेब यांना दिर्घ आयुष्याच्या सुभेच्छा दिल्या सुत्रसंचलन मा कर्मचारी जिल्हाध्यक्ष अशोक वाडेकर यांनी करीत असताना महिलांना टाळ्यांच्या गजरात गाण्यातुन व शायरीतुन कार्यक्रम गाजवला आभारप्रदर्शन तालुकाध्यक्ष सुभाष कांबळे यांनी केले नंतर सर्व महिलांना जेवणाची व्यवस्था करण्यात आली हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी युवा जिल्हाध्यक्षा राजेश जाधव,राधाकीसन भाळशंकर, संतोष जाधव, पद्माकर कांबळे, अशोक कांबळे, मयूर वाघमारे, सुभाष दळवी, धनंजय दळवी इ परीश्रम घेतले

## प्रधानमंत्री, मुख्यमंत्री ग्रामसडक योजनेंतर्गत येणाऱ्या रस्त्यांसह पुलांची दुरुस्ती करणार

### – डॉ.योगेश क्षीरसागर यांची अधिकाऱ्यांसोबत चर्चा– चौसाळा ते वाढवणा रस्त्यावर दोन पूल होणार

बीड (प्रतिनिधी) दि.१० : बीड व शिरूर कासार तालुक्यात झालेल्या अतिवृष्टीमुळे अनेक रस्त्यांसह पुलांचे नुकसान झाले आहे. या पार्श्वभूमीवर राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे बीड विधानसभा अध्यक्ष डॉ.योगेश क्षीरसागर यांनी प्रधानमंत्री व मुख्यमंत्री ग्रामसडक योजनेच्या अधिकाऱ्यांसोबत बीडमध्ये गुरुवारी (दि.९) चर्चा करण्यात आली. यावेळी विभाग अंतर्गत येणाऱ्या रस्ते व पुलांच्या दुरुस्तीची कामे तातडीने पूर्ण करण्याच्या सूचना देण्यात आल्या. राज्याचे उपमुख्यमंत्री तथा बीड जिल्ह्याचे पालकमंत्री अजितदादा पवार यांनी दि.२५ सप्टेंबर रोजी अतिवृष्टीग्रस्त भागांचा पाहणी दौरा करून चौसाळा परिसरातील पुलांच्या दुरुस्तीबाबत तातडीने कार्यवाही करण्याचे आदेश दिले होते. त्यानुसार आढावा घेऊन डॉ.योगेश क्षीरसागर यांनी प्रधानमंत्री ग्रामसडक योजनेचे कार्यकारी अभियंता एम.एम. पाटील यांना परिपूर्ण प्रस्ताव जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन यांच्याकडे सादर करण्यास सांगितले. या प्रस्तावात चौसाळा–पिंपळगाव घाट–वाढवणा रस्ता (इजिमा-४८) येथील दोन नवीन पुलांच्या बांधकामाचाही समावेश करण्यात आला आहे. तसेच, अतिवृष्टीमुळे नुकसान झालेल्या रस्ते व पुलांच्या तातडीच्या देखभाल आणि दुरुस्तीबाबत बैठकीत सूचना देण्यात आल्या. या बैठकीत प्रधानमंत्री व मुख्यमंत्री ग्रामसडक योजनेचे कार्यकारी अभियंता एम.एम. पाटील, उपअभियंते पी.बी. जोगदंड, एच.डी. शिंदे यांच्यासह संबंधित अधिकारी उपस्थित होते. या बैठकीत बीड विधानसभा मतदारसंघातील एनएच-५६१ ते एसएच-५९ — नवगण राजुरी ते सोनगाव रोड, एमआरएल-१३ - नाळवंडी ते ढेकणमोहा, व्हीआर-१२ —लक्ष्मीआई तांडा, एमडीआर-३१ —बीडजवळ, आहेर धानोरा ते वरवटी, भाळवणी ते बेलेश्वर, एसएच-५५ — म्हाळसजवळा, राजापूर, वाकनाथ रोड, एसएच-५६ —म्हाळसापूर ते पिंपळगाव, राक्षसभुवन, कुक्कडगाव, एसएच-५६ —लिंबागणेश, काटवटवस्ती, अंजनवती, घारगाव, एनएच-२११ —मोरगाव ते देवऱ्याचावाडा, एमएसएच-१६ —ढेकणमोहा ते कारळवाडी, निर्मळवाडी, एनएच-२११ — कर्झनी (ब) ते कर्झनी (क), एसएच-६३ — आर्वी, तरडगव्हाण ते गाजीपूर रोड, गात शिरापूर, एसएसएच-१६ —ढेकणमोहा ते आंबेसावळी, मन्यारवाडी रोड, एसएच-५५ — उमरद (क) ते नागापुर बुद्रुक, ब्रन्हानपूर रोड, एसएच-६४ —देवीबाभुळगाव रोड, एमएसएच-१६ —काळेगाव हवेली रोड, एसएच-५५ —गंगनाथवाडी रोड, एमएसएच-१६ — काठोडा ते वांगी रोड, एसएच-५६ —मुळूकवाडी



ते मसेवाडी रोड, ओडीआर-५० —नरनाळे ते डोईफोडेवस्ती रोड, एसएच-५५ —इट तांडा रोड, ओडीआर-११३ —मेंगडेवाडी रोड, ओडीआर-११३ — धुमाळवाडी रोड, ओडीआर-४८ —तेलपवस्ती ते मानेवाडी रोड, एमडीआर-१९ —रुपेवाडी रोड, ओडीआर-४७ —मांडवजाळी ते भाळवणी रोड, एसएच-२६ —खंडाळा ते ढाळेवस्ती रोड, एनएच-२११ —धनगरवाडी रोड, ओडीआर-११५ —फुकेवाडी रोड, वंजारवाडी ते भगवाननगर रोड, आहेर धानोरा ते राममंदिर इंगोळे पूर्व वरवटी रोड, एमएसएच-१६ —वंजारवाडी चऱ्हाटा रोड —तांदळवाडी ते सिसरटवस्ती, एसएच-२११ —कोळवाडी, एसएच-२११ —वानगाव पाईसावस्ती, बोरखेडवस्ती ते बोरखेड–गोलांग्री, एमडीआर-२८ —शाहाबाजपूर सानपवस्ती, एनएच-२११ — आहेरवडगाव ते काटवडा रोड, खांबालिंबा पौंडूळ ते नारायणगड, केतुरा रोड, एमडीआर-२८ — गाजीपूर, एमएसएच-१६ — मैंदा, एमडीआर-२८ —वासनवाडी ते लक्ष्मीनगर, एसएच-२३२ — परभणी ते केसापुरी, एमडीआर-३२ —बोरफडी ते मोहगीरवाडी, लक्ष्मीनगर, एमडीआर-१८ —चव्हाणवाडी, एमडीआर-१८ —खुंड्रस, ओडीआर-५१ —चांदेगाव, ओडीआर-५१ — जाधववस्ती, एसएच-५५ —खांडेपारगाव, एसएच-५५ —अंधरवनपिंप्री, एमडीआर-२८ —गाजीपूर ते शिरूर (कासार) या रस्त्यांसह पुलांची दुरुस्ती केली जाणार आहे. त्यामुळे अनेक गावांचा दळणवळणाचा मार्ग सुकर होणार आहे.

#### देखभाल निकषामध्ये न बसणाऱ्या रस्त्यांसाठी निधी मागणीचा प्रस्ताव

प्रलंबित कामांना गती देण्यासाठी तसेच देखभाल निकषात न बसणाऱ्या रस्त्यांसाठी शासनाकडे निधीसाठीचा प्रस्ताव देण्याच्या सूचना डॉ.योगेश क्षीरसागर यांनी दिल्या. त्याअनुषंगाने अधिकाऱ्यांनी प्रस्ताव पाठविण्याची कार्यवाही सुरू केली आहे.

## बीड जिल्ह्यात जातीय दंगली घडवायचे आहे का ? शेख युनूस

बीड (प्रतिनिधी) महाराष्ट्रात काही आमदार स्वतःला हिंदुत्ववादी समजत आहे. दादा त्यामध्ये आपल्या पक्षातील संग्राम जगताप हे नेहमी जातीय तेढ निर्माण करण्याचे काम करीत असून आपण त्यांना पाठराख करीत आहे की काय असे जनतेकडून बोलले जात आहे. आपला पक्ष हा सर्व धर्म निरपेक्ष आणि पोरोगामी विचारसरणी असणारा पक्ष आहे.मग आपल्या पक्षात हा जातीवादी आणि सडक्या विचाराचा आमदार कसा?

छत्रपती शिवरायांनी कधी जातिवाद केलेला नाही त्यांच्या सैन्यात देखील मुस्लिम मावळे होते. त्यांचे अंगरक्षक हे सुद्धा मुस्लिम होते. हे संग्राम जगताप ला माहित नाही वाटतं. त्यांनी अगोदर इतिहास वाचावा. आणि हे लक्षात ठेवावे की भारत देश हा डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या संविधानावर चालणारा देश आहे. बीड



जिल्ह्यातील लोक हे गुण्या गोविंदाने नांदतात.येथे अठरापगड जातीचे लोक एकमेकांच्या सणासुदीला गोडधोड पदार्थ करून एकमेकाला खाऊ घालतात. एकमेकाचा सुख दुःखात मदत करतात.पण प्रत्येक निवडणुकीच्या वेळेस जाणून बुजून काहीतरी द्वेष पसरवण्याचे काम होत आहे,आणि नवीन मुद्दे समोर आणले जात आहे. मुख्यमंत्री तुमचे, गृहमंत्री तुमचे, उपमुख्यमंत्री तुमचे, मग या मोर्चा मागे उद्दिष्ट काय आहे, आणि हा मोर्चा कशासाठी, याला परवानगी कशी काय दिली. आदरणीय अजित दादा पवार आपण बीड जिल्ह्याचे पालकमंत्री आहात. आणि महाराष्ट्र राज्याचे उपमुख्यमंत्री आहात. त्याचबरोबर आपल्याच पक्षाचे आमदार हे कोणाविरुद्ध मोर्चे काढत आहे. अशा आमदारांना सपोर्ट कोणाचे हे जनतेकडून बोलले जात आहे. हा मोर्चा नसून दोन सौहार्द बिघडवून जातीय तेढ निर्माण करून मुस्लिम समाजाविरुद्ध जाणून बुजून सणासुदीच्या वेळेस तसेच निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर करण्यात येणारे षडयंत्र आहे. प्रशासनाने जिल्ह्यातील कायदा व सुव्यवस्था अबाधित राहण्यासाठी अशा मोर्चाला परवानगी देऊ नये ही जनतेची अपेक्षा आहे.

## सोमवारी ह.भ.प. सौ. सुषमा कुलकर्णी यांची प्रवचन सेवा



बीड । प्रतिनिधी बीड शहरातील बार्शी रोडवरील स्वराज्य नगर येथे राहणारे आणि जिल्ह्यातील सुप्रसिद्ध कीर्तनकार ह.भ.प. माधव महाराज डाके यांच्या ङ्गमाऊली निवास्थानफ येथे यंदाही पारंपरिक पद्धतीने चातुर्मास उत्सवाचे आयोजन करण्यात आले आहे.

आषाढी एकादशीपासून ते कार्तिकी एकादशीपर्यंत चालणाऱ्या या पवित्र चातुर्मास काळात दर सोमवारी रात्री ८ ते ९ वाजेच्या वेळेत विविध ज्ञानेश्वरी प्रेमी महाराज मंडळींच्या प्रवचन सेवेचे आयोजन करण्यात येते. याच अनुक्रमे सोमवार, दिनांक १३ ऑक्टोबर २०२५ रोजी रात्री ८ ते ९ या वेळेत ह.भ.प. सौ. सुषमा कुलकर्णी यांच्या प्रवचन सेवेचे आयोजन करण्यात आले आहे. सदरील प्रवचन सेवेचे थेट प्रक्षेपण माधव महाराज डाके काठवडेकर या फेसबुक अकाऊंटवरून होणार आहे. या चातुर्मास उत्सवात सहभागी होऊन श्री ज्ञानेश्वरी प्रवचनाचा लाभ घ्यावा, असे आवाहन ह.भ.प. माधव महाराज डाके यांनी प्रसिद्धीपत्रकाद्वारे केले आहे.

## ससेवाडी – मोरगाव मार्गावरील पन्नास वर्षांपूर्वीचा रस्ता खुला : महसूल प्रशासनाची प्रभावी कारवाई शेतकऱ्यांमध्ये आनंदाची लाट

### तहसीलदार चंद्रकांत शेळके यांची धडाडी आणि शेतकऱ्यांविषयी असलेला कनवाळूपणा पुन्हा झाला सिद्ध

बीड : प्रतिनिधी) बीड तालुक्यातील ससेवाडी - मोरगाव परिसरात मागील पन्नास ते साठ वर्षांपासून बंद असलेला जुना रस्ता अखेर खुला झाला . दिनांक १० ऑक्टोबर २०२५ रोजी बीडचे तहसीलदार चंद्रकांत शेळके यांच्या उपस्थितीत आणि मार्गदर्शनाखाली महसूल , पोलीस व ग्रामपातळीवरील प्रशासनाच्या संयुक्त कारवाईतून हा ऐतिहासिक निर्णय प्रत्यक्षात उतरला .

ही कारवाई महाराष्ट्र राज्याचे महसुलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांच्या शेतकरी हिताचे निर्णयानुसार विभागीय आयुक्त जितेंद्र पापळकर आणि बीड जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन यांच्या मार्गदर्शनाखाली राबविण्यात आली . महसूल विभागाच्याशेतकरीहिताच्याधोरणात्मककार्यपद्धतीचा हा ठोस परिणाम असल्याचे मानले जात आहे .

गेल्या पाच - सहा वर्षांपासून हा रस्ता काही व्यक्तींनी अडवून ठेवला होता . त्यामुळे ससेवाडीच्या सुमारे 150 शेतकऱ्यांना शेतीकामासाठी तसेच नागरिकांना दळणवळणासाठी मोठा त्रास सहन करावा लागत होता . अखेर महसूल प्रशासनाने कायदेशीर चौकटीत राहून धाडसी कारवाई केली आणि रस्ता



पुन्हा खुला करून ग्रामस्थांना दिलासा दिला .

या कार्यवाहीदरम्यान मंडळ अधिकारी सोनाली कदम , ग्राम महसूल अधिकारी रेश्मा तानगे , ससेवाडीचे सरपंच अरुण रसाळ , संदीप कदम , एम . खान तसेच अनेक स्थानिक शेतकरी उपस्थित होते . पोलीस प्रशासनाच्या वतीने सहाय्यक उपनिरीक्षक विठ्ठल राठोड , म . पो . रमा तुरुकमारे , पोलीस नाईक सुदाम शेलार यांनी शिस्तबद्ध सुरक्षेची जबाबदारी पार पाडली .

भूमापक ए . बी . चव्हाण , संजय जायभाये आणि ए . एन . बीडकर यांनी रस्त्याच्या सीमारेषा मोजून तांत्रिक अडथळे दूर करत कार्यवाहीची पूर्तता केली . उपस्थित प्रशासनिक पथकाने जेसीबीच्या साहाय्याने रस्त्यावरील अडथळे हटवून मार्ग पुन्हा



वाहतुकीसाठी खुला केला . या वेळी तहसीलदार चंद्रकांत शेळके यांनी सांगितले की , " शेतकऱ्यांचा हक्क आणि सार्वजनिक मार्ग सुरक्षित ठेवणे हे प्रशासनाचे कर्तव्य आहे . शासनाच्या मार्गदर्शनाखाली नागरिकांच्या हितासाठी आम्ही तत्पर आहोत . "

महाराष्ट्र शासनाने अलीकडेच शेतकऱ्यांच्या हितासाठी अनेक महत्त्वाचे निर्णय जाहीर केले आहेत . खरीप हंगामासाठी ई - पीक पाहणीस मुदतवाढ देण्यात आली होती . या उपक्रमामुळे शेतकऱ्यांना पीकविमा , अनुदान आणि शासकीय योजनांचा लाभ सोयीस्कररीत्या मिळणार आहे . नैसर्गिक आपत्ती नुकसानभरपाई प्रक्रियेत पारदर्शकता आणण्यासाठी ऑनलाइन पंचनामे प्रणाली राबविण्यात येत आहे . तसेच ड्रोन सर्वेक्षण आणि आधुनिक भूमापन पद्धतीद्वारे नकाशा सुधारणा कार्य देखील सुरू आहे .

तहसीलदार शेळके यांनी शेतकऱ्यांना आवाहन केले की , प्रत्येक शेतकऱ्याने स्वतःची ई - पीक पाहणी नोंदणी तात्काळ पूर्ण करावी . शासनाच्या विविध लाभयोजनांसाठी ही प्रक्रिया आवश्यक आहे . ग्राम महसूल अधिकारी आणि तलाठी शेतकऱ्यांना प्रत्यक्ष मदत करत आहेत .

या कारवाईनंतर ससेवाडी , मोरगाव आणि परिसरातील नागरिकांमध्ये समाधान आणि आनंदाचे वातावरण आहे . अनेक शेतकऱ्यांनी महसूल विभागाचे आभार मानत म्हटले की , " प्रशासनाने आमचा हक्काचा रस्ता पुन्हा परत मिळवून दिला . आता आमची शेती , वाहतूक आणि दैनंदिन कामे सहज पार पडतील . "

या घटनाक्रमातून महसूल प्रशासनाने आपल्या जबाबदारीची जाणीव ठेवत एक आदर्श उदाहरण निर्माण केले आहे . शेतकरीहित , कायद्याचा सन्मान आणि विकास या तिन्ही बाबींचा संगम असलेली ही कारवाई बीड जिल्ह्यात सकारात्मक बदलाचे द्योतक ठरत आहे .

दैनिक लोकआरंभ
लोकक्रांतीचा आरंभ
संपादक:राहुल मारोतीराव वाईकर
शनिवार ११ ऑक्टोबर २०२५
https://lokaarambh.com



# सं पा द की य

## आता बील भरण्यासाठी फोनची गरज नाही, चष्म्याच्या मदतीने करता येणार




युपीआय पेमेंटमुळे पैसे सोबत ठेवण्याची गरज नाही, कारण मोबाईल फोनद्वारे पेमेंट करता येते. मात्र आता पेमेंट करण्यासाठी मोबाइलचीही गरज नाही. कारण आता चष्म्याच्या मदतीने पेमेंट करता येणार आहे. लेन्सकार्टने बी कॅमेरा स्मार्टग्लासेसमध्ये डायरेक्ट यूपीआय पेमेंट्स नावाचे एक नवीन फीचर आणले आहे. या नवीन फीचरच्या मदतीने युजर्सना स्मार्टग्लासेसच्या मदतीने क्यूआर कोड स्कॅन करून पेमेंट करता येते. कंपनीने मुंबईतील ग्लोबल फिनटेक फेस्टिव्हलमध्ये याची माहिती दिली आहे. पुढील काही महिन्यांत हे चष्मे बाजारात दाखल होणार आहेत. हे फीचर कसं काम करणार?

यूपीआय इंटिग्रेशन चष्मे बँक खात्याशी जोडलेले असणार आहेत. यामुळे केवळ व्हॉइस कमांडच्या मदतीने पेमेंट पूर्ण करता येते. हे असे फीचर आहे, ज्याद्वारे पेमेंट करताना फोन वापरण्याची किंवा पिन कोड टाकण्याची आवश्यकता नाही. कंपनीने म्हटले आहे की, नॅशनल पेमेंट्स कॉर्पोरेशन ऑफ इंडिया (एनपीसीआय) चे यूपीआय सर्कल फीचर चष्म्यांना थेट व्यक्तीच्या बँक खात्याशी जोडते. ज्याद्वारे पेमेंट करता येते. पीयूष बन्सल काय म्हणाले?

या फीचरबाबत बोलताना लेन्सकार्टचे अध्यक्ष, सीईओ आणि सह-संस्थापक पीयूष बन्सल म्हणाले की, 'स्मार्ट चष्म्यांचा वापर आपल्या जीवन सुरळीत करतील. पेमेंट्स आपल्या दैनंदिन जीवनाचा एक महत्त्वाचा भाग आहेत. स्मार्ट चष्म्याच्या कॅमेऱ्याद्वारे पेमेंट्सची सुविधा देण्याचे आमचे उद्दिष्ट आहे. अ‍ॅडव्हांस ऑन-द-गो पॉइंट-ऑफ-व्ह्यू (पीओव्ही) कॅमेरा आणि बिल्ट-इन एआय फीचर असलेला बी कॅमेरा स्मार्टग्लासेसमध्ये ही सुविधा दिली जाणार आहे.' कंपनीच्या या निर्णयामुळे युपीआय पेमेंटमध्ये नवी क्रांती होणार आहे.चष्म्याचा व्यवसाय कसा आहे ?

2022 पासून जागतिक स्मार्टग्लास शिपमेंट तिप्पटीपेक्षा जास्त झाले आहे. आयएमएआरसी ग्रुपच्या बाजार संशोधनानुसार, भारतातील एआर आणि व्हीआर चष्म्यांची बाजारपेठ 2024 मध्ये 608 दशलक्ष डॉलर्सपर्यंत पोहोचली आहे. गेमिंग, आरोग्यसेवा आणि शिक्षणातील मागणीमुळे 2033 पर्यंत 1.67 अब्ज डॉलर्सपर्यंत पोहोचण्याचा अंदाज आहे. जागतिक स्मार्ट ग्लासेस बाजारपेठेचे मूल्य $6 अब्ज पेक्षा जास्त आहे, हे 2032 पर्यंत $15.08 अब्ज पर्यंत पोहोचण्याची अपेक्षा आहे.

## संस्थाचालक गोविंदराव वाघ सरांना श्री महालक्ष्मी विद्यालयात श्रद्धांजली अर्पण

# विद्यार्थ्यांसह शिक्षकांच्या डोळ्यात अश्रू..

बीड दि.८(प्रतिनिधी) - शिवनेरी शिक्षण प्रसारक मंडळाचे संस्थापक सचिव गोविंदराव दादाराव वाघ सरांना आज गुरुवार दिनांक 9 रोजी शिदोड येथील श्री महालक्ष्मी माध्यमिक विद्यालयात उपस्थित सर्व शिक्षकवृंदानी साश्रूनयनांनी भावपूर्ण श्रद्धांजली अर्पण केली.

बीड शहरातील शहरातील धांडे गल्ली येथील मूळ रहिवासी व सध्या यशवंत नगर भागात स्थायिक असलेले शिवनेरी शिक्षण प्रसारक मंडळाचे संस्थापक सचिव श्री गोविंदराव दादाराव वाघ सर यांचे बुधवार दिनांक 08 ऑक्टोबर 2025 रोजी दुपारी 03 वाजण्याच्या सुमारास निधन झाले. आज गुरुवार दिनांक 9 ऑक्टोबर रोजी शिदोड येथील श्री महालक्ष्मी माध्यमिक विद्यालयात संस्थेचे संस्थापक सचिव गोविंदराव वाघ यांना भावपूर्ण श्रद्धांजली अर्पण कार्यक्रम घेण्यात आला. यावेळी काही निवडक विद्यार्थी आणि शिक्षकांना आपल्या भावना व्यक्त केल्या. विद्यार्थी आणि शिक्षक आपल्या आठवणींना उजाळा देत होते.



त्यावेळी उपस्थितांचे डोळे पाणावले होते. अनेक विद्यार्थी धाय मोकलून रडत होते. श्रद्धांजली अर्पण करताना श्री आत्माराम वाव्हळ सर म्हणाले आदरणीय गोविंदराव वाघ सर हे एक अष्टपैलू व्यक्तिमत्व, अजातशत्रू असे व्यक्तिमत्वाचे होते. त्यांनी आपल्या संपूर्ण आयुष्यात विद्यार्थ्यांचं कल्याण कसं होईल याच्यावर लक्ष केंद्रित केले होते. त्यांनी आयुष्यभर तन, मन आणि धन लावून अगदी जीव ओतून अध्यापन केले होते. त्यामुळे आज त्यांचे हजारो विद्यार्थी विविध क्षेत्रात कार्यरत आहेत. त्यांच्या विचारांचा आणि कार्याचा वारसा आप आपल्या कार्यक्षेत्रात काम करत असताना रुजविणे, त्यांनी सांगितलेल्या मार्गाने मार्गक्रमण करणे हिच खऱ्या अर्थाने गोविंदराव वाघ सरांना भावपूर्ण श्रद्धांजली ठरेल असे सांगत आपल्या भावना व्यक्त केल्या. तर कार्यक्रमाचा समारोप करताना शाळेचे मुख्याध्यापक श्री दत्तात्रय चव्हाण सर म्हणाले की, आपल्या संस्थेचे संस्थापक सचिव गोविंदराव वाघ सर अतिशय शांत सरळ, साधे आणि निर्मळ मनाचे स्वभावाचे होते. त्यांनी संपूर्ण आयुष्यातील शेवटच्या क्षणापर्यंत विद्यार्थ्यांचा आणि त्यांच्या अडी अडचणी आणि विद्यार्थ्यांच्या प्रश्नांचा आणि समस्यांचाच विचार केला होता. विद्यार्थ्यांचे प्रश्न, अडचणी आणि समस्या निर्माण झाल्या असतील अशावेळी गोविंदराव वाघ सर हे सातत्याने हळवे होत होते. गोविंदराव वाघ यांच्यासारख्या एका हुशार, बुद्धिमान आणि चाणक्ष अशा शिक्षण प्रेमी व्यक्तिमत्वाला आपण मुकलो आहोत. गोविंदराव वाघ नानांच्या जाण्याने आपल्यामध्ये एक मोठी पोकळी निर्माण झाली आहे. ही पोकळी कधीही भरून येणार नाही अशा शब्दात श्री चव्हाण सर यांनी गोविंदराव वाघ नानांना भावपूर्ण श्रद्धांजली अर्पण केली.

त्यानंतर उपस्थित सर्व विद्यार्थी, शिक्षक आणि शिक्षकवृंदांनी श्रद्धांजली अर्पण केली. पसायदानाने कार्यक्रमाचे सांगता करण्यात आली.

# रोहिणी प्रकाशनाचा तृतीय वर्धापन दिन मोठ्या उत्सवात संपन्न

नवी मुंबई प्रतिनिधी. नरेश सोनवणे रोहिणी प्रकाशन मुंबई यांच्या तृतीय वर्धापन दिनानिमित्ताने अकरा पुस्तकांचा प्रकाशन सोहळा मोठ्या उत्सवात दिनांक ५/१०/२०२५ रोजी ऐरोली येथे संपन्न झाला. यावेळी सामाजिक विषयावरील नाटिका आणि राज्यस्तरीय काव्य संमेलन संपन्न झाले.

सोहळ्याला प्रमुख पाहुणे म्हणून मा. श्री. विजयजी चौगुले साहेब ( उपनेते शिवसेना महाराष्ट्र राज्य ), श्री.उत्तमराव तरकसे सर ( नवी मुंबई क्राईम ब्रँच पोलीस अधिकारी ), श्री. प्रमोद सूर्यवंशी सर ( कवी लेखक ग्राफिक्स कार ) श्री. नमाई सुभाष नाईक सर, ( कवी निवेदक ) श्री नरेंद्र कदम सर( प्राध्यापक आदित्य कॉलेज लेखक चित्रकार नाटककार ) उपस्थित होते. तर प्रमुख पाहुणे म्हणून सौ. तारा रामचंद्र ठाकरे मॅडम ( मुख्याध्यापिका प्रबोधन विद्यालय ) श्री.रामू वाघमारे या कार्यक्रमाला उपस्थित होते.

लेखक कवी चंद्रहास धुमाल सर यांच्या



संसार माया, भाग्यविधाता कवीदेर्व,पुष्पमाला, आरोग्यतीर्थ या चार पुस्तकांचे प्रकाशन झाले. तर कवी,लेखिका सुनंदा रामटेके यांच्या किमया आणि 'क्षण वेचलेले' ही दोन पुस्तकं प्रकाशित झाली. यांचा फुलात जिथे फुल येते, पुस्तक प्रकाशन करण्यात आले. रघुनाथ मोहिते सर यांच्या 'शब्दचित्र 'तर डॉक्टर स्मिता सदानंद मुकणे यांच्या 'ऋतुरंग ',पसरलेले सुरेख रंग या दोन पुस्तकांचे प्रकाशन करण्यात आलं तर दिवाकर सभारंजक सर यांच्या 'शतकयात्री' या पुस्तकाचं प्रकाशन यावेळी करण्यात आल.

कार्यक्रमाची सुरुवात आदर्शांच्या प्रतिमाना पुष्पमाला अर्पण करून व दीप प्रज्वलन करून मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले. प्रकाशिका रोहिणी माया राम वाघमारे यांनी आपला तीन वर्षाचा प्रवास थोडक्यात मांडला प्रमुख पाहुणे श्री विजयजी चौगुले साहेब यांनी आपलं मनोगत व्यक्त करताना प्रकाशन आणि प्रकाशिका यांचं कौतुक करून साहित्य प्रवासाला शुभेच्छा दिल्या या साहित्याच्या वाटचालीस आपण खंबीरपणे प्रकाशनाच्या मागे उभे असल्याचे त्यांनी सांगितले. उपस्थित मान्यवरांनी ही भरभरून कौतुक करून पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या.

त्यानंतर लेखक,कवी,नाटककार संतोष रामचंद्र जाधव सर आणि सह कलाकार उपासना कीरपण यांनी 'दरवाजा बाहेर' ही सामाजिक विषयावरील डोळ्यात पाणी आणणारी आणि समाजाच्या आजच्या परिस्थितीला वाचा फोडणारी एक हृदयस्पर्शी नाटिका सादर केली. त्याचे तांत्रिक व्यवस्थापन माननीय रमेश मारुती पाटील सर यांनी पाहिलं. या नाटीकेने सर्वांची मने जिंकून कार्यक्रमाला विशेष रंग चढवला.

महाराष्ट्राच्या कानाकोपऱ्यातून आलेल्या नामवंत तीस कवींनी आपल्या निसर्ग,मानव,प्रेम आणि सामाजिक विषयाला हात घालणाऱ्या सदाबहार कविता सादर केल्या त्यामध्ये कवी शैलजा करोडे, सुभाष नाईक, सिद्धार्थ मगर,संतोष जाधव, शितल शिंदे, प्रियंका कुटे, निर्मला वेठम, रोहिणी जाधव, गणेश रिंगे, अनुराधा ससाने, आकाश वेले, बुद्ध कन्या भालेराव, रेणुका अगुरेड्डी, प्रसाद दोडकुलकर, रफिक इनामदार, रमेश काळुखे, योगेश मांदाडे, स्वप्निल कांबळे, महादेव सोळगे

# दिवाळीनिमित्त दैनिक समर्थ राजयोगच्या वतीने

## फराळ आणि पूरग्रस्त बाधित विद्यार्थ्यांना शालेय साहित्याचे वाटप !

बीड प्रतिनिधी

यावर्षी बीड संपूर्ण मराठवाड्यामध्ये परतीच्या पावसाने आहाकार केला. मोठ्या प्रमाणामध्ये जलप्रलय झाल्याने शेतीसह घरांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले. बीड जिल्ह्यातील ज्या विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान झाले आहे अशा विद्यार्थ्यांना शालेय साहित्याचे वाटप आणि दिवाळीनिमित्त फराळ स्नेह मिलन कार्यक्रमाचे आयोजन दैनिक समर्थ राजयोग परिवाराच्या वतीने करण्यात आले आहे. या कार्यक्रमाचा लाभ बीड जिल्ह्यातील तमाम पत्रकार यांच्यासह पत्रकार प्रेमी नागरिक, प्रशासकीय अधिकारी, लोकप्रतिनिधी यांनी घ्यावा असे आवाहन संपादक वैभव स्वामी यांनी केले आहे.

बीड जिल्ह्यामध्ये यावर्षी मोठ्या प्रमाणात परतीचा पाऊस झाला. या पावसाने मोठ्या प्रमाणात शेतीचे आणि नदी काठावरील वस्त्यांचे, घरांचे नुकसान झाले आहे.ज्या विद्यार्थ्यांचे पुराच्या पावसामध्ये शैक्षणिक साहित्य वाहून गेले, अथवा पावसाने भिजल्यामुळे खराब झाले, अशा गरीब गरजूवंत विद्यार्थ्यांना दैनिक समर्थ राजयोग परिवाराच्या वतीने दिवाळीनिमित्त शैक्षणिक साहित्य देऊन त्यांना या संकटात मदत करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. बीड जिल्ह्यातील ज्या विद्यार्थ्यांचे या पुरामुळे वह्या, पुस्तके, शैक्षणिक साहित्य यांचे नुकसान झाले आहे अशा विद्यार्थ्यांनी,अथवा बीड जिल्ह्यातील बाधित शाळेच्या मुख्याध्यापकांनी 94 22 74 37 92 या व्हाट्सअप नंबर वर संपर्क साधून नोंद करावी. या विद्यार्थ्यांना दिवाळीनिमित्त आयोजित स्नेहमिलन कार्यक्रमांमध्ये फराळासह मान्यवरांच्या शुभहस्ते शैक्षणिक साहित्य वाटप करण्यात येणार आहे. या दिवाळी फराळ स्नेह मिलन कार्यक्रमांमध्ये बीड जिल्ह्यातील तमाम

### दानशूरांना आवाहन...

बीड जिल्ह्यातील पूरग्रस्त बाधित विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्य देण्यासाठी दानशूरांनी शैक्षणिक साहित्य प्रत्यक्ष दैनिक समर्थ राजयोगचे मुख्य कार्यालय सम्राट चौक, शाहूनगर कॉर्नर, बीड येथे आणून द्यावे. अथवा शैक्षणिक साहित्यासाठी आपल्या इच्छेनुसार 98 22 62 85 21 या फोन पे नंबर वर आर्थिक सहकार्य करून या कार्यक्रमासाठी आपला हातभार लावावा. जे व्यक्ती, संस्था या उपक्रमामध्ये आपला सहभाग देतील त्यांची नावे जाहीर करून सामाजिक योगदानासाठी त्यांचे उपस्थित मान्यवरांच्या शुभहस्ते सन्मानपत्र देऊन अभिनंदन करण्यात येणार आहे. (जर कोणाला आपले नाव जाहीर करायचे नसेल तर त्यांचे नाव गुपित राहील.) दानशूर इच्छुकांनी मोठ्या मनाने विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक भवितव्यासाठी सढळ हाताने आर्थिक मदत करावी असे आवाहन संपादक वैभव स्वामी यांनी केले आहे.

पत्रकार बांधव यांच्यासह पत्रकार प्रेमी नागरिक, प्रतिष्ठित नागरिक, स्वातंत्र्य सैनिक स्वातंत्र्य सैनिक आणि त्यांचे पाल्य, डॉक्टर, वकील, शिक्षक, इंजिनीयर, सहकार तज्ञ यांच्यासह लोकप्रतिनिधी, प्रशासकीय अधिकारी यांनी उत्स्फूर्तपणे सहभागी होऊन या सामाजिक उपक्रमामध्ये सहभाग नोंदवावा असे आवाहन दैनिक समर्थ राजयोगचे संपादक वैभव स्वामी यांनी केले आहे.

...

# निर्माते राम शंकर आणि डॉ. राजेश देगन यांच्या "महिमा खातू श्याम की" या भक्तीपर चित्रपटाचा भव्य मुहूर्त पार पडला.

ज्येष्ठ अभिनेते सुरेंद्र पाल, गायिका साधना सरगम आणि स्नेहा शंकर, संगीतकार दिलीप सेन, विनोदी कलाकार सुनील पाल, प्रसिद्ध सिनेमॅटोग्राफर रमाकांत मुंडे, अभिनेता अतुल राजकुले आणि कास्टिंग डायरेक्टर हॅरी वर्मा यांची विशेष उपस्थिती होती. निर्माता-दिग्दर्शक म्हणून असंख्य चित्रपट आणि व्हिडिओ अल्बम तयार करणारे राम शंकर त्यांचे सह-निर्माते राजेश देगन आणि जय कुमार दिवाना यांच्यासह "महिमा खातू श्याम की" हा भक्तीपर कौटुंबिक चित्रपट सादर करत आहेत. चित्रपटाचा मुहूर्त अंधेरी (पश्चिम) एलिट बँक्वेट येथे आयोजित करण्यात आला होता, ज्यामध्ये चित्रपट उद्योग आणि माध्यमांमधील अनेक मान्यवरांनी मंत्रोच्चार आणि दीपप्रज्वलन केले होते. हे उल्लेखनीय आहे की राम शंकर ब्लेसिंग टेलिमीडियाच्या बॅनरखाली बाबा खातू श्यामवरील पहिला हिंदी चित्रपट "महिमा




खातू श्याम की" मोठ्या प्रमाणात तयार करत आहेत. या चित्रपटाचे दिग्दर्शन अनेक सुपरहिट चित्रपटांचे दिग्दर्शक विश्वास परब यांनी केले आहे. लेखक चंचल पुंडिर यांनी त्यांच्या लेखनातून बाबांचा महिमा उत्तम प्रकारे मांडला आहे. मोहित बाजपेयी आणि विमल गर्ग यांनी लिहिलेले गीत, आदित्य शंकर यांच्या संगीतासह, साधना सरगम आणि स्नेहा शंकर यांनी सुंदरपणे गायले आहे. पंकज शर्मा हे संचालन संचालक आहेत. प्रसिद्ध भजन गायक कन्हैया मित्तल यांनी त्यांच्या चित्रपटातील पदार्पणातील शीर्षक गीत गायले आहे. चित्रपटाचे निर्माते राम शंकर यांनी सांगितले की त्यांना लहानपणापासूनच बाबा खाटू श्याम यांच्याबद्दल खूप भक्ती आहे. बाबा खाटू श्यामच्या चमत्कारांच्या कथा लोकांपर्यंत पोहोचवण्याच्या उद्देशाने ते या चित्रपटाची निर्मिती करत आहेत.

छायाकार : रमाकांत मुंडे, मुंबई

दैनिक लोकआरंभ
लोकक्रांतीचा आरंभ
संपादक:राहुल मारोतीराव वाईकर
शनिवार ११ ऑक्टोबर २०२५
https://lokaarambh.com



# Gold ETF, सोने की म्युच्युअल फंड, कशामुळे नशीबाला चमक?




सध्या सोन्याची चमक वाढली आहे. सोने माघार घेण्याच्या तयारीत नाही. सोन्याने आताच सव्वालाखांचा टप्पा गाठला आहे. तर सोने अजून भरारी घेण्याची शक्यता वर्तवण्यात येत आहे. सोने महागले असले तरी अनेकांना सोन्यातच गुंतवणूक करायची आहे. सोन्यावणी परतावा मिळावा अशी त्यामागे अपेक्षा आहे. मग Gold ETF, सोने की म्युच्युअल फंड, कशामुळे नशीबाला चमक येईल? तुमचा पोर्टफोलिओ कोणत्या गुंतवणुकीमुळे सोनेरी होईल?

सोन्याचा भाव काय? 10 ऑक्टोबर 2025 रोजी गुडरिटर्ननुसार 10 ग्रॅम 24 कॅरेट सोन्याचा भाव 1,22,440 रुपये इतका होता. तर 22 कॅरेट 10 ग्रॅम सोन्याचा किंमत 1 लाख 12 हजार 220 रुपये इतका होता. ibjarates इंडियन बुलियन्स मार्केटनुसार 24 कॅरेट 10 ग्रॅम सोन्याचा भाव 1 लाख 20 हजार 850 रुपये तर 22 कॅरेट 10 ग्रॅम सोने 1 लाख 10 हजार 690 रुपयांवर होते. स्थानिक बाजारात विविध कर, जीएसटी यांच्या प्रभावामुळे किंमतींवर परिणाम होतो. जळगावच्या सराफा बाजारातही सोने कमाल दाखवत आहे.

गुंतवणुकीची घाई नको

गेल्या 12 महिन्यात सोन्याने 51.33 टक्क्यांचा परतावा दिला आहे. तुमची वैयक्तिक जोखीम घेण्याची क्षमता आणि सोन्याचे गणित याची सांगड घालत तुम्हाला गुंतवणूक करता येईल. सराफा बाजारात ग्राहकांची गर्दी एकदमच कमी नाही. अनेक जण ठोक सोने खरेदी करत आहे. तर काही महिला ग्राहक दाग-दागिने खरेदी करत आहेत. तर तज्ज्ञांना गोल्ड ईटीएफ, डिजिटल गोल्ड आणि म्युच्युअल फंड हे गुंतवणुकीसाठी सर्वात चांगले पर्याय वाटतात. या तीनही प्रकारात मोठा धोका नाही. सोने बाळगण्याची चिंता नाही. हा व्यवहार पारदर्शक आहे. गुंतवणुकीसाठी मोठी रक्कम नसली तरी चालते. तुम्ही SIP च्या माध्यमातून छोटी छोटी रक्कम गुंतवून या तीनही प्रकारात मोठी गुंतवणूक करू शकता. भविष्यात सोन्याची चांगली वाटचाल राहिल्यास तुम्हाला सोन्यावाणी परतावा मिळतो.

पण काही तज्ज्ञांच्या मते सोन्यात हा सध्या चढाईचा काळ आहे. सोने कधी झर्रकन खाली येईल हे सांगता येत नाही. त्यामुळे सोने खरेदीचा सपाटा न लावण्याचा सल्लाही काही तज्ज्ञ देतात. गोल्ड ईटीएफ, डिजिटल गोल्ड, गोल्ड म्युच्युअल फंडमध्ये गुंतवणूक करताना जोखीम घेण्याची तयारी, परताव्यासाठी प्रतिक्षा आणि भविष्यातील तुमचे आर्थिक उद्दिष्ट याचा सारासार विचार करुन गुंतवणूक करणे फायदेशीर असेल, असे अनेक तज्ज्ञांचे मत आहे.

**डिस्क्लेमर : हा गुंतवणुकीचा सल्ला नाही. गुंतवणूक करण्यापूर्वी तुमचा अभ्यास महत्त्वाचा आहे. वित्त सल्लागाराचा सल्लाही महत्त्वाचा आहे.**

# ट्रांसजेंडर व्यक्तींसाठी भेदभावरहित भविष्याची गरज!डॉ.चंद्रसेन कोठावळे

पाचोड: (प्रतिनिधी) शिवछत्रपती महाविद्यालय, पाचोड येथील समाजशास्त्र विभागातर्फे पीएम-उषा (PM-USHA) योजनेंतर्गत आयोजित केलेल्या 'जेंडर अँड सोसायटी' प्रमाणपत्र कोर्सचा समारोप नुकताच मोठ्या उत्साहात पार पडला. या कोर्सद्वारे विद्यार्थ्यांना लिंगभाव (Gender) आणि समाजातील त्याची भूमिका याविषयी सखोल ज्ञान प्रमाणपत्र कोच निमित्ताने देण्यात आले समारोप कार्यक्रमाच्या अध्यक्षीय भाषणात महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. चंद्रसेन कोठावळे यांनी अत्यंत महत्त्वाचे मत व्यक्त केले. त्यांनी 'ट्रांसजेंडर व्यक्तींसाठी भेदभावरहित भविष्याची गरज' या विषयावर जोर दिला. ते म्हणाले, "एक सुजाण समाज म्हणून आपले कर्तव्य आहे की आपण प्रत्येक नागरिकाला सन्मान आणि समानतेने वागणूक द्यावी. ट्रान्सजेंडर व्यक्तींना



समाजाच्या मुख्य प्रवाहात आणण्यासाठी केवळ सहानुभूती नाही, तर सकारात्मक आणि कृतीशील बदलांची गरज आहे."

या कार्यक्रमाचे प्रास्ताविक कोर्स समन्वयक डॉ. गांधी बानायत यांनी केले. त्यांनी गेल्या पंधरा दिवसांत झालेल्या अभ्यासक्रमाचा आणि विविध उपक्रमांचा आढावा सादर केला. या कोर्समध्ये लिंगभाव, लिंग आणि लैंगिकता (Sexuality) या मूलभूत संकल्पनांपासून ते समाजातील रूढीवादी भूमिका, भेदभावाची कारणे आणि समानता प्रस्थापित करण्याचे उपाय यांवर सखोल मार्गदर्शन करण्यात आले. कोर्सच्या यशस्वी पूर्ततेनंतर सर्व सहभागी विद्यार्थ्यांना प्रमाणपत्रे वितरित करण्यात आली. यावेळी व्यासपीठावर उपस्थित मान्यवरांनी विद्यार्थ्यांना भविष्यात लिंगभावावर आधारित रूढ समजुती (Stereotypes) दूर करण्यासाठी सक्रिय भूमिका घेण्याचे आवाहन केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ. विलास महाजन यांनी अत्यंत प्रभावीपणे केले, तर उपस्थितांचे आभार डॉ. हरिप्रसाद बिडवे यांनी मानले. या समारोपाला समाजशास्त्र विभागातील प्राध्यापक, विद्यार्थी आणि शिक्षकेतर कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# किमान आधारभूत किंमतीवर कापूस विक्रीसाठी शेतकऱ्यांनी कपास किसान ॲपवर नोंदणी करावी

मकरंद चिनके गंगाखेड तालुक्यातील शेतकऱ्यानी 2025-26 या वर्षात किमान आधारभूत किमतीवर (एमएसपी) योजनेअंतर्गत आपला कापूस विकण्यासाठी मोबाईल मधील गुगल प्ले स्टोअर मधून "कपास किसान"ॲप डाऊनलोड करून ॲपद्वारे दिनांक 30 ऑक्टोबर 2025 पर्यंत स्वतःची नोंदणी करण्याचे आवाहन गंगाखेड कृषी उत्पन्न बाजार समितीचे सभापती साहेबराव भोसले,उपसभापती संभाजीराव




पोले,सचिव परमेश्वर वानखेडे व सर्व संचालक मंडळ यांच्या वतीने करण्यात आले आहे. शेतकऱ्यांना किमान आधारभूत किंमत (एमएसपी) योजनेचा लाभ मिळावा यासाठी भारतीय कापूस महामंडळ (सीसीआय) च्या वतीने "कपास किसान" मोबाईल ॲप आणले असून या ॲपवर कापसाची नोंदणी केल्याने शेतकऱ्यांना आपल्या कापसाला शासकीय दर मिळणार आहे. यासाठी गंगाखेड तालुक्यातील शेतकऱ्यांनी 30 ऑक्टोबर पर्यंत जमिनीच्या नोंदी 2025-26 चे ऑनलाईन अद्ययावत कागदपत्रे महसूल प्राधिकरणाने योग्यरीत्या प्रमाणित केलेल्या पीक लागवडीची नोंद 2025-26 चे ऑनलाईन अद्ययावत स्वतःचे वैद्य आधार कार्ड फोटो दिलेल्या कालावधीत वेळेवर स्व:नोंदणी करून किमान आधारभूत किंमत (एमएसपी) योजनेचा लाभ घेण्याचे आवाहन कृषी उत्पन्न बाजार समिती गंगाखेडच्या वतीने शेतकऱ्याना करण्यात आले आहे.

# शिक्षण विभागाचा अजब कारभार मराठवाडा शिक्षक संघाची कार्यवाहीची मागणी

छत्रपती संभाजीनगर प्रतिनिधी: वरिष्ट वेतनश्रेणीसाठी माध्यमिक शिक्षण विभागात मंजुरीची आवश्यकता नाही आणि प्राथमिक शिक्षण विभागात मंजुरीची आवश्यकता लागते मराठवाडा शिक्षक संघाची अट रद्द करण्याची मागणी शासनाने वरिष्ठ व निवड श्रेणीसाठी प्रशिक्षण आयोजित केलेले होते अनेक शिक्षकांनी प्रशिक्षण पूर्ण केलेले आहे



परंतू आपल्या अधिनिस्त कार्यालयामध्ये या याविषयी गोंधळाची परिस्थिती निर्माण झालेली आहे अनेक जिल्ह्यांमध्ये माध्यमिक विभागासाठी वरिष्ठ वेतन श्रेणी साठी मंजुरी घेण्याची आवश्यकता नाही आणि त्या जिल्ह्यांमध्ये प्राथमिक विभागांमध्ये मंजुरी घ्यावी लागते यासाठी आपण याविषयी स्पष्टता आणण्यासाठी आपले आदेश निर्गमित करावे अशी मागणी विभागीय शिक्षण उपसंचालक श्री प्रकाश मुकुंद यांना भाई चंद्रकांत चव्हाण यांच्या नेतृत्वात करण्यात आली 17मे 2024 रोजी मा विभागीय शिक्षण उपसंचालक लातूर यांनी याविषयी स्पष्ट निर्देश दिलेले आहेत ते पत्र सोबत जोडलेले आहे. आपल्या कार्यालयामार्फत याविषयी वरिष्ठ नेत्यांनी श्रेणीसाठी शिक्षण विभागाची मंजुरी आवश्यक नाही असे स्पष्ट आदेश काढून शिक्षकांची होणारी हेळसांड आणि आर्थिक लुट तात्काळ थांबवावी अशी स्पष्ट मागणी मराठवाडा शिक्षक संघाने केली यावेळी भाई चंद्रकांत चव्हाण जिल्हा सचिव नवनाथ मंत्री महानगर सचिव योगेश खोसरे अशोक ढमढेरे विनोद केनेकर विलास चव्हाण दिपकराजे शिंदे राजकुमार वावरे शिवकुमार जैस्वाल हे उपस्थित होते

# सामाजिक बांधिलकी म्हणून मदतीचा हा छोटासा प्रयत्न- एस. एम. देशमुख

# मराठी पत्रकार परिषदेच्या वतीने पाच गावांमध्ये ब्लॅंकेट चे वाटप







बीड / प्रतिनिधी बीड जिल्ह्यामध्ये मोठ्या प्रमाणात पाऊस झाल्याने आणि तलावातील पाणी सोडल्याने अनेक गावांचे मोठे नुकसान झाले. याबरोबर गोदाकाठ आणि सिंदफणा काठावरील शेतकऱ्यांचे ही मोठे नुकसान झालेले आहे. अनेकांची घरे वाहून गेली. अनेकांची घरे पडली. शेतकऱ्यांची शेती निस्तनाबूत झाली. अशा परिस्थितीत शेतकऱ्यांना शक्य होईल तेवढी मदत करण्याचा प्रयत्न मराठी पत्रकार परिषदेच्या वतीने करण्यात आला. माजलगाव तालुक्यातील पुरुषोत्तम पुरी, मंजरथ, डेपेगाव, सांडस चिंचोली, आळसे वाडी, गंगामसला या ठिकाणी परिषदेच्या वतीने वतीने ब्लॅंकेट चे वाटप करण्यात आले. यावेळी मराठी पत्रकार परिषदेचे मुख्य विश्वस्त एस.एम. देशमुख सर यांच्या हस्ते हे वाटप करण्यात आले. यावेळी बोलताना मराठी पत्रकार परिषदेचे विश्वस्त देशमुख म्हणाले की पत्रकार हा समाजाचा घटक असतो आणि सामाजिक बांधिलकी म्हणून आमच्याकडून जेवढे शक्य होईल तेवढे आम्ही शेतकऱ्यांना मदत करण्याचा प्रयत्न करत आहोत. मराठवाड्यामध्ये अनेक ठिकाणी मराठी पत्रकार परिषदेच्या वतीने मदत करण्यात आल्याची माहिती त्यांनी यावेळी दिली.

बीड जिल्ह्यामध्ये मोठ्या प्रमाणात पावसाने आणि तलावातून मोठ्या प्रमाणात पाणी सोडल्याने शेतकऱ्यांच्या जमिनी खरडून गेल्या. अनेकांची पिके नेस्तनाबूत झाली. अनेकांची घरे पडली.सांडस चिंचोली सारख्या गावांमध्ये तर संपूर्ण पाण्याचा वेढा पडला होता. अशा परिस्थितीत लोकांचा संपर्क तुटल्याने लोकांना वाचवणे हा मोठा प्रश्न होता. अनेकांना एनडीआरएफ च्या पथकाने बाहेर काढले. तसीच परिस्थिती देपेगाव,सांडस चिंचोलीची होती. या ठिकाणीही मोठ्या प्रमाणात गावामध्ये पाणी घुसले आता परिस्थिती पूर्व पदावर येत असून शेतकऱ्यांना आणि ग्रामस्थांना धान्यापासून ते वस्तू पर्यंत सर्वच गोष्टीच्या मदतीची गरज आहे. अशा परिस्थितीत मराठी पत्रकार परिषदेच्या वतीने माजलगाव तालुक्यातील पुरुषोत्तमपुरी, डेपेगाव, मंजरथ ,सांडस चिंचोली, आळसेवाडी, गंगामसला या गावांमध्ये ब्लॅंकेट चे वाटप करून काही प्रमाणात का होईना पूरग्रस्तांना दिलासा दिला. यावेळी बोलताना एस.एम.देशमुख म्हणाले की मराठी पत्रकार परिषदेने नेहमीच सामाजिक बांधिलकी जपली आहे. मराठवाडा आणि सोलापूर या भागामध्ये मोठ्या प्रमाणात पाऊस झाल्याने मोठ्या प्रमाणात नुकसान झाले. मराठी पत्रकार परिषदेच्या वतीने सोलापूर आणि मराठवाड्यातील जिल्ह्यामध्ये शक्य होईल तेवढी मदत देण्याचा प्रयत्न आम्ही करत आहोत. याच पार्श्वभूमीवर बीड तालुक्यातील या पाच गावांना ब्लॅंकेट चे वाटप करण्यात येत आहे. परिषदेच्या वतीने पत्रकारांचे प्रश्न तर सोडवण्यासाठी संघर्ष केला जातोच त्याबरोबर सामाजिक बांधिलकी म्हणून शेतकऱ्यांना शक्य होईल तेवढी मदत करण्याचा आम्ही प्रयत्न करत असल्याचे त्यांनी सांगितले. यावेळी मराठी पत्रकार परिषदेचे विभागीय सचिव रवी उबाळे, विभागीय समन्वयक सुभाष चौरे, जिल्हाध्यक्ष विशाल साळुंके, डिजिटल मीडियाचे राज्याचे अध्यक्ष अनिल वाघमारे, माजलगाव तालुका अध्यक्ष हरीश यादव, पत्रकार पांडुरंग उगले, डिजिटल मिडिया परिषदेचे तालुका अध्यक्ष सुहास बोराडे, धम्मपाल डावरे या पत्रकारांसह गावातील सरपंच, चेअरमन, प्रतिष्ठित नागरिक, ग्रामस्थांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती.

# नासिकचे कलावंत घडवणार माय् वाईस कराओके तर्फे दहावे पुष्प गुफताना (सुगधीत आठवणी)

हिंदी-मराठी गीतांचा सुरेल नजराणा हर्षराज सभागृह, गोविंद नगर ,भुजबळ फार्म हाउस जवळ,बेलाविस्टा,नविन नासिक येथे साजरा करण्यात आला यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून समाज भुषण सुभाष पोपटराव बोराडे रिपाई नासिक जिल्हा उपप्रमुख व डॉ बाबासाहेब आंबेडकर समाज भुषण पुरस्कार प्राप्त महाराष्ट्र शासन,सह भिमश्री जेष्ठ मार्गदर्शक मा, विजयराज पगारे यांचा पुष्प गुच्छे देवून गौरविण्यात आले व समाज सेवक मा,संजय विष्णु जाधव समाज सेविका मंगलाताई मोकळ,समाज सेविका वत्सला ताई गांगुर्डे,निलम गांगुर्डे, मिता सुचक, कुसुम चावला, ज्योती जाधव मार्गदर्शक व गायक भगवान गांगुर्डे आयोजक संगीतकार अतुल गांगुर्डे,हर्षराज हॉलचे संचालक हर्षराज शित्रे,सह मान्यवराना पुष्पगुच्छ देवून सत्कार करण्यात आला यावेळी अप्रतीम गाणी नामवंत गायक व गायकी कलावंतांनी सुरेल आवाजात हिदी गीता चार नजराना पेश केला यावेळी भाव गीते,भक्ती गीते सह ह्दयाला स्पर्श करणारी चित्रपटातील गानी गायली,यावेळी समाज भुषण सुभाष बोराडे यांनी आपल्या भाषणात सांगितले नासिक जिल्हा हा सामाजिक क्षेत्रा बरोबर कलावंताचा जिल्हा आहे या जिल्ह्यात चित्रपट महर्षी दादासाहेब फाळके, कवीरत्न वामनदादा कर्डक, सगितकार व गायक अतुल भगवान गांगुर्डे व राहुल भगवान गांगुर्डे सह अनेक सगितकार झाले तर अनेक चित्रपट निर्माते, कवी, गायक संगीतकार घडले आहे व भविष्यात या नासिक जिल्हात अनेक कलाकार, कलावंतांना व्यासपीठ व आपल्या कलेची कीर्ती देशभर पोहोचवण्यासाठी व या कलाकार गायकाना घडवून नामवंत बनवण्यासाठी माय वाईस कराओकेचे संस्थापक व




गीतकार,सगितकार ,गायक अतुल भगवान गांगुर्डे हे करीत आहे यावेळी उत्कृष्ट गायक मार्गदर्शक भगवान् गांगुर्डे,अतुल गांगुर्डे,दत लोळगे,अजय कस्तुरे अतुल बाबरे,अविनाश देवरूखकर, तुषार जोशी,चंद्र कांत महाले, पप्पू काकुळते श्रवण रिपोर्ट,श्रीकृष्ण ददगाळ, विठ्ठल श्रीवंत, सुरेद्र सोनार गायीका शैलजा सोनार,वनिता आहेर ज्योती आडके,रेखा ठाकुर, निवेदक अतुल गांगुर्डे व गायीका नंदिनी जाधव यांनी केले ध्वनी सुरेश कापरे, सागर कापरे यांनी दिले मोलाचे सहकार्य हर्षदिप शित्रे, किरण अहिरे , रसिका दाणी,रेवती वाघमारे यानी केले आयोजकाच्या वतिने सर्वाचे सत्कार करून आभार व्यक्त करण्यात आले

# विशेष पॅकेजमधून जिल्ह्याचं नाव वगळलं, सत्ताधारी पक्षातील आमदार आक्रमक, थेट सरकारला इशारा

राज्य सरकारने घोषित केलेल्या विशेष पॅकेजमधून नांदेड जिल्हा वगळण्यात आला आहे. यावर शिवसेनेचे नांदेड दक्षिण मतदार संघाचे आमदार आनंद पाटील बोंढारकर यांनी प्रतिक्रिया दिली असून, चांगलाच संताप व्यक्त केला आहे. मी सत्ताधारी आमदार असलो तरी शेतकऱ्याचा आहे. शेतकऱ्याला न्याय मिळवून देण्यासाठी टोकाची भूमिका घ्यायला तयार आहे. असा थेट इशाराच त्यांनी सरकारला दिला आहे. तसेच ज्या अधिकाऱ्यांनी ही चूक केली, त्यांच्यावर देखील कारवाई करावी अशी मागणी देखील त्यांनी केली आहे. शेतकऱ्यांमध्ये असंतोष निर्माण झाला आहे, अनेक शेतकऱ्यांचे फोन आले. शेतकऱ्यांची जी भावना आहे ती अगदी बरोबर आहे, नांदेड जिल्ह्यात खूप मोठ्या प्रमाणात पाऊस झाला आहे. शेतकऱ्याचे मोठ्या प्रमाणात नुकसान झालं आहे. नांदेडचे नाव जीआरमध्ये आलं नाही, ही नांदेड जिल्ह्यासाठी दुर्भाग्याची गोष्ट आहे. जीआरमध्ये काही चूक झाली असेल, जर अधिकाऱ्यांनी काही चूक केली असेल तर त्यांच्यावर कारवाई करावी, यामुळे जिल्ह्यांचं प्रचंड मोठं नुकसान झालं आहे, असं बोंढारकर यांनी म्हटलं आहे. दरम्यान पुढे बोलताना ते म्हणाले की, शेतकऱ्यांचा रोष वाढत आहे, शेतकऱ्याच्या रोषाला आम्हाला समोर जावं लागत आहे. मी सरकारमधला आमदार असतो तरी आधी मी शेतकरी आहे. शेतकऱ्यांसाठी कुठल्याही टोकाच्या भूमिकेत जायची माझी तयारी आहे. शेतकरी जीआरची होळी करत आहे, कारण शेतकऱ्याचं पोट जळालं आहे. जीआरमध्ये नांदेड जिल्ह्याचा समावेश व्हावा अशी आमची मागणी आहे, असं यावेळी त्यांनी म्हटलं आहे.



राज्याला अतिवृष्टीचा मोठा फटका बसला आहे, अतिवृष्टीमुळे मोठं नुकसान झालं आहे. ऐन हातातोंडाशी आलेला घास निसर्गानं हिरावून घेतल्यामुळे बळीराजा हवालदिल झाला आहे. सरकारने नुकसानग्रस्त शेतकऱ्यांसाठी विशेष पॅकेज जाहीर केलं आहे, मात्र विशेष पॅकेजमधून नांदेड वगळण्यात आल्यानं आमदार आनंद पाटील बोंढारकर यांनी संताप व्यक्त केला आहे, त्यांनी थेट सरकारला इशारा दिला आहे.



# पदवीधारकांनी मतदार नोंदणी करून घ्यावी-प्रा. सुशीलाताई मोराळे

बीड । प्रतिनिधी पदवीधर मतदार संघ निवडणूक औरंगाबाद ( छत्रपती संभाजीनगर) मराठवाडा विभागाची मतदार नोंदणी कार्यक्रम जाहीर झालेला असून निवडणूक आयोगाने ६ नोव्हेंबर २०२५ ही नोंदणीची शेवटची तारीख असल्याचे कळवले आहे. मराठवाडा विभागाचा रहिवासी असलेल्या मतदारांनी एक जबाबदार नागरिक म्हणून आपली नावे नोंदवून यादीत समाविष्ट करावीत असे आवाहन प्रा. सुशीलाताई मोराळे यांनी केले आहे. राज्यात बेरोजगार युवकांची संख्या लाखोमध्ये आहे, कधी दुष्काळ तर कधी अतिवृष्टीने बेरोजगार युवक देशधडीला रलागला आहे, नोकऱ्याच नाहीत हातात पदव्यांची भेंडोळी घेऊन युवकांचे तांडेच्या तांडे उध्वस्त होत आहेत. वैफल्यग्रस्त



युवक बेरोजगारीच्या भस्मासुरामुळे आत्महत्या करीत आहे, लाखोंच्या संख्येने नोंदणी करून पदवीधर मतदार संघातील आमदाराची मक्तेदारी संपवण्यासाठी पदवीधारकांनी संघटितपणे नाव नोंदणी करणे गरजेचे आहे छत्रपती संभाजीनगर ( औरंगाबाद), परभणी, नांदेड, हिंगोली, उस्मानाबाद ( धाराशिव), जालना, बीड सह लातूर जिल्ह्यातील रहिवाशी असलेले पदवीधर या निवडणुकीसाठी पात्र आहेत. प्रत्येक तहसील कार्यालयात तसेच जिल्हा निवडणूक अधिकारी कार्यालयात नोंदणीचे फॉर्म उपलब्ध आहेत, पासपोर्ट साईजचा रंगीत फोटो, डिग्री प्रमाणपत्र किंवा तृतीय वर्षाचे गुणपत्रक, आधार कार्ड किंवा निवडणूक कार्ड विवाहित महिला मतदारांसाठी विवाह नोंदणी प्रमाणपत्र किंवा सरकारी गॅजेटची साक्षांकित प्रत किंवा शपथपत्र ही कागदपत्रे नोंदणीसाठी आवश्यक आहेत. जुन्या यादीत नाव असले तरी ती नोंदणी चालत नाही नवीन नोंदणी करावी लागते. मराठवाड्यातील सर्व प्रवर्गातील पदवीधारकांनी मतदार नोंदणी गांभीर्य पूर्वक करावी. पदवीधर हा सुजाण, जागरूक मतदार आहे आपला मताचा अधिकार वापरण्यासाठी पदवीधारकांनी नाव नोंदणीसाठी जागरूक असायला पाहिजे असे आव्हान अंभोरा, दौलावडगाव, घाटपिंपरी, सालेवडगाव, सुलेमान देवळा, धामणगाव, दादेगाव, कडा, आष्टी या ठिकाणच्या पदवीधर मतदारांना मतदार नोंदणी संपर्क अभियान प्रसंगी प्रा. सुशीलाताई मोराळे यांनी केले आहे. याप्रसंगी पदवीधारांशी थेट संपर्क करून नोंदणीचे आव्हान करण्यात आले.



परळी श्री.महेश खोत यांना वाढदिवसाच्या शुभेच्छा देताना संपादक राजेश साबणे, धीरज जंगले, शिवाजी नाडार, संगमेश्वर थोटे, वैजनाथ वेरुळे, महादेव तिडके,गोविंद आव्हाड आदी.

# महाराष्ट्र गौरव पुरस्काराने सुनील इंगळे सन्मानित

मुंबई : मुंबई येथील इंडियन कॉपीराईट प्रोटेक्शन व सहकर्म सामाजिक कल्याण फाउंडेशन च्या वतीने समाजातील निस्वार्थ सेवा करणाऱ्या समाजसेवकांचा पुरस्कार देऊन सन्मान करण्यात आला. याच कार्यक्रमात कल्याण येथील बहिणाई ट्रस्टचे अध्यक्ष, समाजसेवक व ज्येष्ठ पत्रकार सुनील इंगळे यांना पत्रकारितेमधील उत्कृष्ट सेवेबद्दल त्यातील उल्लेखनीय कामगिरीबद्दल व सामाजिक बांधिलकीतून स्वतः देहदान व नेत्रदान चा संकल्प करून पर्यावरण संदर्भात झाडे लावा पण ती जगवा यासाठी इतरांनाही त्याबाबत जागृत करण्याचे काम ते सतत करीत असतात. इंडियन कॉपीराईट प्रोटेक्शन अँटिपायरसी सेल मुंबईचे मुख्य तपासी अधिकारी माननीय रामजीत गुप्ता व सहकर्म फाउंडेशनच्या संस्थापक अध्यक्षा सौ. शितल पाटील यांच्या हस्ते ट्रॉफी व सन्मानचिन्ह देऊन गौरविण्यात आले. या कार्यक्रमासाठी ऑपरेशन कारगिल सर्जिकल स्ट्राइक वन इंडियन आर्मीचे महेंद्र गोविंद गवई हे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. सुनील इंगळे यांना या प्राप्त झालेल्या पुरस्काराबाबत हितचिंतकाकडून अभिनंदन व कौतुक केले जात आहे.

# बीडमध्ये पोलिसांचा वर्दीचा गैरवापर : शेतकऱ्यांना धमक्या, जवानांवर खोटे गुन्हे; दोषींवर निलंबनाची मागणी–सोनवणे

बीड जिल्ह्यातील पोलिस विभागातील काही गंभीर घटनांनी प्रशासनात आणि समाजात खळबळ उडवली आहे. शेतकऱ्यांना धमकावणे, संशयितांना अमानुष मारहाण करणे आणि देशसेवा करणाऱ्या जवानांवर खोटे गुन्हे दाखल करण्यासारख्या घटनांमुळे पोलिसांच्या वर्दीचा गैरवापर होत असल्याचे आरोप होत आहेत. या पार्श्वभूमीवर ऑल इंडिया पँथर सेनेने दोषी पोलिस कर्मचाऱ्यांवर तात्काळ निलंबनाची कारवाई करण्याची मागणी केली आहे. नेकनूर पोलीस स्टेशन हद्दीत पवनचक्की कंपनीच्या नुकसानभरपाईबाबत सुरू असलेल्या वादात एका शेतकऱ्याला पोलिसांनी तुझे कॅरेक्टर खराब करून टाकीन अशी धमकी दिल्याचा व्हिडिओ सोशल मीडियावर व्हायरल झाला आहे. त्या शेतकऱ्याने न्याय मागितल्याने त्याच्या णझडउ परीक्षेची तयारी करणाऱ्या मुलांना सुद्धा धमकावण्यात आल्याचा आरोप आहे. या प्रकरणामुळे नागरिकांमध्ये असुरक्षिततेची भावना निर्माण झाली असून, पँथर सेनेने याला पोलिसांकडून कायद्याचा भंग ठरवले आहे. काही दिवसांपूर्वी आष्टी पोलीस स्टेशन अंतर्गत कडा चौकी येथे अविनाश सोनवणे यांना बेल्ट, काठी आणि लाथा बुक्यांनी मारहाण केल्याचा आरोप आहे. या घटनेचे व्हिडिओ व फोटो सोशल मीडियावर प्रसारित झाले असून, डीवायएसपी आष्टी यांनी पिडिताची जाब विचारणा केली आहे. मात्र, अद्याप कोणतीही कारवाई झालेली नाही. पँथर सेनेने या प्रकरणी बीडचे पोलिस अधीक्षक यांना निवेदन देऊन दोषींवर निलंबनाची मागणी केली आहे. चार महिन्यांपूर्वी एका महिला पोलिसासह दोन पोलिस कर्मचाऱ्यांनी आसाम येथे कार्यरत असलेल्या भारतीय जवान रोहित सोनवणे यांच्याविरुद्ध खोटी एनसी (छेप-उेसपळूरलश्रश) दाखल केली होती. त्या वेळी ते ड्युटीवर असल्याने न्यायालयात अनुपस्थित राहिले, आणि कार्यकारी दंडाधिकाऱ्यांनी त्यांना ५,००० रुपयांचा दंड ठोठावला. या घटनेवर संताप व्यक्त करत नितीन सोनवणे, महाराष्ट्र प्रवक्ता व जिल्हाध्यक्ष, ऑल इंडिया पँथर सेना म्हणाले – देशसेवक जवानाला जाणून बुजून त्रास देणाऱ्या पोलिसांना कठोर शिक्षा झाली पाहिजे. अशा कृतींमुळे सामान्य नागरिकांचा पोलिसांवरील विश्वास डळमळीत होत आहे. पँथर सेनेने उपमुख्यमंत्री अजित पवार, सामाजिक न्यायमंत्री रामदास आठवले आणि बीडचे पालकमंत्री यांना निवेदने सादर करून तातडीची चौकशी व कारवाईची मागणी केली आहे. पोलिस बांधवच जर नागरिकांना धमकावणार असतील, तर न्याय कुठे मागायचा? या घटना दाबण्याचा प्रयत्न झाल्यास आम्ही तीव्र आंदोलन करू, असा इशारा नितीन सोनवणे यांनी दिला. या सर्व प्रकरणांवर बीड पोलिस अधीक्षकांकडून अद्याप अधिकृत प्रतिक्रिया आलेली नाही. मात्र, घटनांमुळे जिल्ह्यात सामाजिक तणाव वाढला असून, न्यायव्यवस्थेवरील विश्वासार्हतेचा प्रश्न उपस्थित झाला आहे. स्त्रोतांच्या माहितीनुसार, पँथर सेना यासंदर्भात लवकरच आंदोलनाची तयारी करत आहे.

# महाराष्ट्र लेवा पाटीदार महासंघ व लेवा चेंबरऑफ कॉमर्स इंडस्ट्रीज अँड एग्रीकल्चर पुणे यांची संयुक्त संवाद सभा

मुंबई:(प्रतिनिधी,सुनिल इंगळे) महाराष्ट्र लेवापाटीदार महासंघ व लेवा चेंबर ऑफ कॉमर्स इंडस्ट्रीज अँड एग्रीकल्चर,पुणे,यांची संयुक्त संवाद सभा कै.भास्करराव महाजन सामाजिक शैक्षणिक सांस्कृतिक व इंदाला शैक्षणिक संकुल, मुरबाड रोड,बापसई, कल्याण या ठिकाणी नुकताच संपन्न झाला.या कार्यक्रमासाठी भव्य अशा व्यासपीठावर महासंघाचे अध्यक्षअरुणदादा बोरोले,LCCIAअध्यक्ष डॉ सुरेंद्र पाटील,डॉ.आर डी चौधरी,डॉ.प्रमोदमहाजन,डॉ.विजय महाजन,सौ.जयश्री महाजन,कृष्णाजी खडसे, डॉ.पवन भोळे,डॉ.दिलीप नाफडे,डॉ.मिलिंदपाटील,विकास वारके,डॉ.निळकंठ चौधरी,ज्ञानेश्वर पाटील, महेश बोरोले,दिव्यकांत नारखेडे,डॉ.एमएन पाटील,उद्धव नारखेडे,पांडुरंग उर्फ बंडूदादा काळे,श्री.शामसुंदर पाटील(IAS), डॉ सुनील भिरुड,डॉ.श्री.नीरा पाटील, रूपाली ठोंबरे,महेश भारंबे, सौ.नीलिमा वारके,डॉ.विलास खर्चे,श्री.सुनील इंगळे, निलेश बढे,मधुकर भोजू चौधरी,लोमदास लोमटे, नितीन जावळे,डॉ.किरण चौधरी,सौ.ललिता पाटील, सौ.नीता वराडे,सौ.नीलिमा नेहेते,सौ.नीता वायकोळे, सौ.विभावरी इंगळे,सौ. प्रतिभा राणे,सौ.सुनंदा बोरोले,डॉ,सौ.सुनीता चौधरी,सीमा गाजरे,आशिष चौधरी,प्रफुल्ल बढे, नितीन सरोदे,नितीन इंगळे, भूषण गारसे,संजय झोपे,डॉ.केजी भोळे,शैलेंद्र बेंडाळे,रवि पाटील प्रतिभाग्रज,सुहास बोंडे,डॉ. संजय पाटील,हेमंत चौधरी, गेंदा पाटील,रत्नाकर चौधरी,सुरेखा कुरकुरे,पुंडलिक सरोदे,नरेंद्र पाटील,मेघश्याम चौधरी,डॉ. धनराज बी.पाटील,राजू फा लक,दिलीप कोल्हे,राजेंद्र बोरोले,दिलीप राणे आदी उपस्थित होते.यात महासंघ आणि LCCIA पदाधिकारी, सल्लागार,आमंत्रित,सत्कारार्थी,मुंबई परिसरातील वेगवेगळ्या लेवा समाज वीस मंडळांचे अध्यक्ष आदींचा समावेश होता.इंदाला ग्रुप चे सर्वेसर्वा डॉ.विजय महाजन यांनी त्यांच्या कॉलेज मधील स्टाफ आणि कल्याण परिसरातील तरुण कार्यकर्त्यांच्या मदतीने इंदाला च्या सुंदर इमारती, सुंदर परिसरात सजवलेल्या सभागृहात अतिशय सुंदर आयोजन आणि नियोजन केले होते.कार्यक्रमाचे वैशिष्ट्य म्हणजे या संवाद सभेसाठी समाजातील नामवंत उद्योगपती, व्यावसायिक,वेगवेगळ्या क्षेत्रातील दिग्गज,समाजाला वाहून घेतलेले सामाजिक कार्यकर्ते,उत्साही समाज मंडळे पुरुष आणि महिलांचा प्रचंड सहभाग होता. सर्व उपस्थितांचे,पाहुण्याचे स्वागत महासंघाच्या आचार संहितेप्रमाणे पुष्पगुच्छ न देता शब्द सुमनांनी करण्यात आले.कार्यक्रमाची सुरुवात कवयित्री आई बहिणाबाई आणि समाजाचे श्रद्धास्थान सरदार पटेल यांना वंदन करून दीप प्रज्वलनाने झाली.त्यानंतर समाजातील ज्ञातअज्ञात मृत व्यक्तींना श्रद्धांजली अर्पण करण्यात आली.कार्यक्रमाचे प्रास्ताविक महासंघाचे अध्यक्ष अरुण बोरोले यांनी भोरगाव लेवा पंचायत ही आपली मातृसंस्था असल्याचे प्रतिपादन करून,महासंघआणिLCCIA,त्याच बरोबर लेवा युथ फोरम ,सर्व वर वधू सूची तयार करणारे समाज मंडळ,या समाजाच्या सर्व शीर्षस्थ संस्था आहेत. प्रत्येकाने आपापली कामे चोख बजावून समाजाला कसा फायदा होईल याचाच विचार करण्याचे आवाहन केले.समाजातील या सर्व शिखर संस्थानी एकत्र येऊन कार्य केले तर समाजाचे ज्वलंत प्रश्न लवकर मिटतील,असेआवाहन त्यांनी केले.दुसरे प्रास्ताविक LCCIA चे डॉ.आर डी चौधरी यांनी केले.त्यांनी समाजाला व्यवसायाभिमुख बनवण्याचे आपले उदिष्टअसल्याचे सांगितले.समाजालाअशा एकत्रीकरणाची गरज असल्याचे त्यांनी नमूद केले. यानंतर प्रतिभाग्रज रवी पाटील यांनी लेवा समाजावरील एकत्रीकरणाचे स्वलिखित सकल लेवा गीत स्वतः सादर केले.त्यामुळे उत्साहाचे वातावरण निर्माण झाले.महासंघाचे कोषाध्यक्ष डॉ मिलिंद पाटील यांनी आपल्या शीघ्र कवित्वाने सामाजिक संघटना आर्थिक सक्षम करण्यासाठी समाजाला आवाहन केले. सामाजिक ज्वलंत प्रश्न व्यसनाधिनता,युवा व पालक प्रबोधन यावर सामाजिक कार्यकर्ते आणि महासंघाचे ज्येष्ठ सल्लागार डॉ.प्रमोद महाजन यांनी प्रबोधन केले आणि उपस्थितांच्या प्रश्नांना उत्तरे दिली.त्यानंतर सकल लेवा संघटन होतच आहे पण धीम्या गतीने होत आहे यावर विवेचन करण्यासाठी महासंघाचे सल्लागार ज्ञानेश्वर पाटीलआणि महासंघाचे कार्यकारिणी सदस्य महेश बोरोले यांनी सहभागघेतला.उपस्थितांच्या प्रश्नांना त्यांनी उत्तरे दिली.महासंघाची लेवा पाटीदार समाजासाठी आदर्श विवाह आचारसंहिता याचेसामूहिक वाचन आणि चर्चा पिंपळे सौदागर मंडळाचे कृष्णाजी खडसे यांनी घडवून आणली त्यानंतर त्यांच्या बरोबर समाजबांधवांनी आचार संहितेचे पालन करण्याची शपथ घेतली.महासंघातर्फे मुलींच्या पौगंडावस्थेतील अडचणी, जाणीव जागृती, जीवन कौशल्ये मुली आणि पालकांसाठी सुसंवाद साधत यावर प्रबोधनात्मक टिप्पणी सौ सारिका पाटील यांनी केली

This Newspaper Printed, Publisher, Editor and Owned by RAHUL MARUTIRAO WAIKAR and Printed at RAJVEER PRINTERS, Rajmata Jijau Colony, Navgan Collage, Road,- Beed Dist - Beed Pin-431122 (Maharashtra) and Published At Dainik LOK AARAMBH OFFICE- House No. 01/03/862, Rajmata Jijau Colony, Navgan College Road,- Beed Dist - Beed Pin-431122 (Maharashtra). Editor- RAHUL MARUTIRAO WAIKAR Mobile: 9272132450 Email : dainiklokaarambh@gmail.com

हे पत्रक मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक राहुल मारुतीराव वाईकर यांनी राजवीर प्रिंटर्स, राजमाता जिजाऊ कॉलनी, नवगण कॉलेज रोड, बीड जि.बीड-४३११२२ (महाराष्ट्र) येथे छापून दैनिक लोक आरंभ कार्यालय, हाऊस नं.०१/०३/८६२० राजमाता जिजाऊ कॉलनी, नवगण कॉलेज रोड, बीड जि. बीड- ४३११२२ (महाराष्ट्र) येथे प्रसिद्ध केले. मो. ९२७२१३२४५०, संपादक: राहुल मारोतीराव वाईकर Email : dainiklokaarambh@gmail.com